# जाहिर नोटीस

तमाम पुरवठादार यांस कळविणेत येते की, जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस तसेच त्यांचे नियंत्रणाखालील तालुका न्यायालयांच्या इमारतीमधील अग्निशामक दंडगोल पुनर्भारित करावयाचे आहेत. सदर अग्निशामक दंडगोल पुनर्भारित करणे हे न्यायालयांच्या इमारतींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत तातडीची बाब आहे. त्याकरीता खालील नमूद केलेल्या न्यायालयांमधील अग्निशामक दंडगोल पुनर्भारित करणेसाठी दरपत्रके मागविणेत येत आहेत. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे:

| न्यायालयाचे नांव | ABC Type 5 Kg | ABC Type 6 Kg | ABC Type 9 Kg | ABC Type 10 Kg | Water Co2 Type 9 Ltr. | DCP Type 5 Kg | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जिल्हा न्यायालय,सिंधुदूर्ग | ३८ | १ | — | — | १६ | १० | ६५ |
| दि.न्या.(क.स्तर),मालवण | ९ | ५ | ६ | — | — | — | २० |
| दि.न्या.(क.स्तर),कणकवली | — | — | — | १० | — | — | १० |
| दि.न्या.(क.स्तर),कुडाळ | ५ | — | — | ६ | १ | १ | १३ |
| दि.न्या.(क.स्तर),वेंगुर्ला | — | — | — | ८ | ३ | — | ११ |
| दि.न्या.(क.स्तर),देवगड | — | — | — | — | ३ | २ | ५ |
| दि.न्या.(क.स्तर),दोडामार्ग | — | — | — | २५ | — | — | २५ |
| दि.न्या.(क.स्तर),सावंतवाडी | — | — | १ | ११ | — | — | १२ |
| **एकूण** | **५२** | **६** | **७** | **६०** | **२३** | **१३** | **१६१** |

## अटी व शर्ती

१) दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशिलासह तारखेसहीत, बंद लखोटयामधुन, मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग—ओरोस यांचे नांवे असावे. लखोटयावर 'अग्निशामक दंडगोल पुनर्भारीत करणेकरीता दरपत्रक' असा उल्लेख करणेत यावा.

२) दरपत्रक सादर करणा—या पुरवठादार यांची वस्तू व सेवा करांतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.

३) दरपत्रकामध्ये SGST/CGST क्रमांक नमूद करावा. तसेच कार्यालयीन दस्तऐवजी तयार करणेकामी, दुकानाचे लायसन्स, पॅनकार्ड, पासबुकच्या पहील्या पानाची झेरॉक्स प्रत व रद्द केलेला चेक दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

४) पुरवठादार यांनी कार्यालयीन वेळेत संबंधीत न्यायालयांच्या कार्यालयातील दंडगोल पुनर्भारीत करुन दयावयाचे आहेत. तसेच पुनर्भारीत केल्यानंतर सदर दंडगोल आहे त्या ठिकाणी पुन्हा बसवून देणेचे आहेत.

५) जाहीर नोटीसीमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

६) सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकमध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

७) अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचा राहील.

तरी, इच्छुकांनी पुढील अटी व शर्तीस अधीन राहून **दि. १३/०३/२०२५** पर्यंत आपली दरपत्रके जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग येथे सादर करावीत.

दिनांक :—२८/०२/२०२५

सहाय्यक अधीक्षक(वित्त),
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

**********

म.जा.क्र.ग्रंथा./१२८१ सन २०२५
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस
दिनांक :— २८/०२/२०२५

प्रत माहितीसाठी व जरुरत्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

१. मा. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)
२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)
३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)
४. मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग. (ई—मेलद्वारे)
५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)
७. मा.जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस यांचे नोटीसबोर्डवर
८. डी. एस. ए., जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता